मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# थेरगावातील डीपीबाधित घरांना अभय

## चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांचे रस्ताबाधितांना आश्वासन

**पिंपरी | प्रतिनिधी**


नवीन प्रारूप विकास आराखड्यानुसार थेरगाव मधून अंदाजे अडीच हजार घरांवरून डीपी रस्ता जात असल्याने अनेकजन भयभीत झाले आहेत. मात्र याबाबत चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी घराच्या भिंतीची एक ही वीट पडू देणार नाही असे आश्वासन नागरिकांना दिले आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

प्रारूप विकास आराखडा प्रसिध्द झाल्यानंतर शहरातील अनेक परिसरात चुकीच्या पध्दतीने आरक्षण पडल्यामुळे नागरिक सैरभैर झाले आहे. अनेक ठिकाणी आरक्षण रद्द करण्याच्या मागण्या केल्या जात आहेत. थेरगाव परिसरातील डीपी प्लॅनच्या संदर्भात अनेक प्रश्न, शंका उपस्थित झाल्या आहेत.

**प्रारूप विकास आराखड्यानुसार असे आहे रस्त्यांचे आरक्षण**

दत्तनगर परिसरात एक मीटरचा रस्ता १२ मीटर तसेच २४ मीटरचा रस्ता हा थेरगाव रहाटणी लिंकरोडपासून दगडू पाटीलनगर पासून मंझिल रोड, आर.एम.बी.शकील रोड, शहीद राजगुरु पथ पासून औंध रावेत रोडला जोडण्यात येत आहे. तर दुसरा २४ मीटर रस्ता पडवळनगर, शिवतिर्थनगर,विश्वशांती कॉलनी, दत्तराज कॉलनी, हनुमान नगर पासून काळेवाडी फाटा असा दाखवला आहे.

रिंग रेल्वे रोड- भक्ती शक्ती पासून भेळ चौक प्राधिकरणाचा मधला भाग ते बिजलीनगर तेथून थेरगाव पद्मजी मिलला लागून पुढे श्रीकृष्ण कॉलनी, पवार नगर, थेरगाव, रहाटणी लिंक रोड, क्रांतीवीर नगर, तुळजाई कॉलनी, साई कॉलनी, पवारनगर, बेलठीका नगर, नागुबाई बारणे खाजगी शाळा ते सुंदर कॉलनी , वृदावंन कॉलनी, अशोक सोसायटी, हनुमान नगर, संभाजीनगर मार्गे काळेवाडी फाट्यापासून रहाटणीपर्यंत असा आहे.



प्रारूप विकास आराखड्यानुसार या सोसायटीतील कॉलनीतील अंदाजे अडीच हजार घरे बाधित होत आहेत. मागील काही दिवसांपूर्वी या परिसरातील लोकांनी चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्याशी द न्यू मिलेनियम स्कूल येथे भेट घेऊन घरे वाचवावी अशी मागणी केली.

> “ प्रारूप विकास आराखडा प्रसिध्द होताच द न्यू मिलेनियम स्कूल च्या येथे रस्ता बाधित अडीच ते तीन हजार लोक आली होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली आहे. तसेच नगररचना विभागासोबतही चर्चा केली आहे. सेक्शन २५ नुसार एएलयू करताना जागेवरची परिस्थिती पाहिली नाही. प्रारूप विकास आराखड्यानुसार दोन ते अडीच हजार घरे बाधित होतात. मात्र या घरांवरून रस्ता न जाता त्याला आम्ही पर्यायी रस्त्या सुचवला आहे. त्यामुळे कुठल्याही घराच्या भिंतीची एक ही वीट जाणार नाही. आमच्या घरावरून रस्ता जाऊ देणार नाही हे माझे आश्वासन आहे.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

> “ थेरगाव परिसरातील डीपी प्लॅन करताना प्रशासनाने प्रत्यक्षात काय परिस्थीती आहे. किंवा लोकप्रतिनिधींशी चर्चा न करता या रस्त्याचे आरक्षण टाकले आहे. याबाबत आमचे आमदार शंकर जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्याशी चर्चा केली आहे. त्यानुसार एकाही घराची वीट जाणार नाही. त्या रस्त्याला पर्यायी जागा सूचवली आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. किंवा विरोधकांच्या भूल-थापांना बळीही पडू नये.
>
> **- मनीषा पवार, माजी नगरसेविका.**

---

# चिखली-आकुर्डी रस्त्याची दुरावस्था; वाहनचालक त्रस्त

## लवकरात-लवकर या रस्त्याचे काम मार्गी लावावे : परिसरातील नागरिकांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली-आकुर्डी रस्त्याची दुरावस्था म्हणजे खड्ड्यात रस्ता अशी झाली आहे. वाहनाचलकांना रस्ता चुकवून गाडी चालवणे कठीण झाले आहे. गाड्यांचा खिळखिळाट तर होतोच आहे, शिवाय अपघाताची भितीही आहे. पावसानंतर रस्त्यावर तळ्याचे स्वरूप येते आहे. त्यात खड्डा न दिसल्याने गाड्या आदळल्या जात आहेत. लवकरात-लवकर या रस्त्याचे काम मार्गी लावावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी तसेच वाहनचालकांनी केली आहे.

चिखली-आकुर्डी रस्त्याचे रूंदीकरण होणार असल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या बांधकामावर कारवाई करण्यात आली. मात्र रस्त्याचे काम सुरु नाही. सध्या पावसामुळे या रस्त्याची बिकट परिस्थिती झाली आहे. वाहनचालकांना, विद्यार्थ्यांना ये-जा करताना मोठ्या मुश्किलीचा सामना करावा लागतो आहे. आजूबाजुला ड्रेनेजसाठी खोदलेले रस्ते, खडी, खड्डे यामुळे वाहनचालक वैतागले आहेत.



> “ पाऊस पडल्यानंतर या रस्त्यावर तळे साचले जाते. रस्त्यावरून ये-जा करताना अनेकदा दुचाकीचे किरकोळ अपघात, घसरून पडण्याच्या घडना घडल्या आहेत. त्यामुळे लवकरात-लवकर रस्त्यांची दुरुस्ती करून घ्यावी. खड्डे बुजवून घ्यावेत.
>
> **- यश साने, युवा नेते.**

> “ चिखली-आकुर्डी रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे. चिखलीतील मोठा नाला ते साने चौक चोवीस मीटर रस्त्याचे मोठे काम सुरु होणार आहे. त्यापूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत. लवकरच हे काम सुरु होईल.
>
> **- विजय वायकर, फ-क्षेत्रिय कार्यलय स्थापत्य विभाग.**

> “ चिखली-आकुर्डी रस्ता, सत्संग रोडचा कॉर्नर परिसरातील अंतर्गत रस्ते पावसाने खराब झाले आहेत. चिखली-आकुर्डी रस्त्यावर सर्वाधिक खड्डे झाले असल्याने वाहनचालकांना गाडी चालवताना मोठी कसरत करावी लागते आहे. खड्डे चुकवत जीव मुठीत धरून गाडी चालवावी लागते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन खड्डे बुजवावे, रस्ता दुरुस्त करावा.
>
> **- कुंदन गायकवाड, माजी नगरसेवक.**

# पुण्यातील कर्करोग रुग्णालयाचं अखेर ठरलं!

## ससून रुग्णालयाशेजारील 'एमएसआरडीसी'च्या जागेवरच उभारणी होणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात स्वतंत्र कर्करोग रुग्णालयाच्या उभारण्याचा प्रस्ताव आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (एमएसआरडीसी) ससून सर्वोपचार रुग्णालयाशेजारील जागा यासाठी योग्य आहे. ही जागा कर्करोग रुग्णालयासाठी देण्याची तयारी 'एमएसआरडीसी'ने दर्शविली आहे. त्यामुळे लवकरात लवकर जागेचा प्रश्न मार्गी लावून कर्करोग रुग्णालयाच्या उभारणीला गती दिली जाईल, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.



ससून सर्वोपचार रुग्णालयात वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री मिसाळ यांनी शुक्रवारी आढावा बैठक घेतली. बैठकीला आमदार बापू पठारे, हेमंत रासने, ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार उपस्थित होते. या बैठकीनंतर बोलताना मिसाळ म्हणाल्या, 'ससूनचा स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव आहे. 'एमएसआरडीसी'ची ससूनशेजारील जागा यासाठी योग्य आहे. परंतु, ही जागा मधल्या काळात एका विकसकाला भाडेतत्त्वावर दिली गेली. ही जागा कर्करोग रुग्णालयाला मिळावी, असा प्रस्ताव 'एमएसआरडीसी'ला पाठविण्यात आला. यावर त्यांनी जागा देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे ही जागा लवकरच ताब्यात मिळून कर्करोग रुग्णालय उभारणी सुरू होण्याची अपेक्षित आहे.'

ससूनमध्ये केवळ पुणे जिल्ह्यातूनच नव्हे, तर राज्यभरातून रुग्ण उपचारांसाठी येतात. रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने रुग्णालयावर ताण वाढला आहे. रुग्णालयातील ११ मजली इमारतीत ५२० नवीन रुग्णशय्यांना मंजुरी देण्याचा प्रस्ताव आहे. याचबरोबर रिक्त पदांची संख्याही जास्त असून, ती भरण्यासाठी पावले उचलली जाणार आहेत. रुग्णालयात एमआरआय, सीटी स्कॅन आणि कॅथलॅब या अत्याधुनिक निदान सुविधांमध्ये वाढ करण्यात येईल, असेही मिसाळ यांनी स्पष्ट केले.

### अस्वच्छतेवर ताशेरे

» ससून रुग्णालयाच्या आवारातील अस्वच्छतेवर राज्यमंत्री मिसाळ यांनी ताशेरे ओढले. त्या म्हणाल्या, की रुग्णालयाच्या आवारासह विद्यार्थी वसतिगृहांमध्ये पुरेशी स्वच्छता नाही. अपुरे मनुष्यबळ असून, असलेले मनुष्यबळही पूर्ण क्षमतेने कामावर येत नसल्याची रुग्णालय प्रशासनाची तक्रार आहे. अपुऱ्या मनुष्यबळाची समस्या सोडविण्यात येणार आहे. स्वच्छतेच्या बाबतीत रुग्णालय प्रशासनाने योग्य ती खबरदारी घ्यावी.

### ससून रुग्णालयाचे प्रस्ताव

- » स्वतंत्र कर्करोग रुग्णालय : खर्च – ८६० कोटी रुपये
- » सुपर स्पेशालिटी रुग्णायल : खर्च – ६३३ कोटी रुपये
- » एमआरआय सुविधा – २७ कोटी रुपये
- » सीटी स्कॅन सुविधा – ७.५ कोटी
- » कॅथलॅब सुविधा – १७ कोटी रुपये

# हिंजवडी आयटी पार्कमधील भूसंपादनाचा 'चेंडू'!

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठीच्या 650 कोटींच्या प्रकल्पांचा प्रशासकीय गोंधळ

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांचे सुमारे ६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे नियोजन केले आहे. या प्रकल्पांच्या भूसंपादनाचा चेंडू पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) पुन्हा 'एमआयडीसी'कडे टोलविला आहे. गेल्या सहा महिन्यांपासून भूसंपादनाचा हा प्रशासकीय गोंधळ सुरू आहे. त्यामुळे हे प्रकल्प लांबणीवर पडत आहेत.



हिंजवडी आयटी पार्क परिसरात वाहतूक कोंडीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. यामुळे 'एमआयडीसी'ने वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या प्रकल्पांचे नियोजन केले. त्यात लक्ष्मी चौक उड्डाणपूल, शिवाजी चौक ते स्मशानभूमी सहापदरी रस्ता आणि आयटी पार्क टप्पा एक ते टप्पा तीन नवीन रस्ता असे तीन प्रकल्प प्रस्तावित आहेत. या प्रकल्पांचा अंदाजे खर्च ६५० कोटी रुपये आहे. या प्रकल्पांसाठी भूसंपादनाची जबाबदारी सहा महिन्यांत आधी सार्वजनिक बांधकाम विभाग, नंतर 'एमआयडीसी' आणि त्यानंतर 'पीएमआरडीए'ला देण्यात आली. या गोंधळामुळे आयटी पार्कमधील प्रकल्प कागदावरच राहिले.

या पार्श्वभूमीवर 'पीएमआरडीए'चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी शासकीय यंत्रणा, आमदार शंकर मांडेकर आणि संबंधित शेतकऱ्यांची संयुक्त बैठक गुरुवारी (ता.२७) घेतली. या बैठकीत त्यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यावेळी शेतकऱ्यांनी विकास हक्क हस्तांतरणाऐवजी (टीडीआर) रोख मोबदला देण्याची मागणी केली. यामुळे 'एमआयडीसी'नेच भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठवावा, असे निर्देश आयुक्तांनी दिले. यासंबंधी तातडीने भूमी अभिलेख विभागाकडून मोजणी करून घेण्याची सूचनाही त्यांनी 'एमआयडीसी'ला केली आहे.

### भूसंपादनाचा प्रवास

» आयटी पार्कमधील प्रकल्पांसाठीची जागा सुरुवातीला सार्वजनिक बांधकाम विभाग संपादित करून 'एमआयडीसी'ला देणार होता. परंतु, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत 'एमआयडीसी'नेच हे भूसंपादन करावे, असा निर्णय झाला. सार्वजनिक बांधकाम विभागाने आधी भूसंपादन करून नंतर ही जागा 'एमआयडीसी'ला हस्तांतरित करण्यात वेळ घालवू नये. थेट 'एमआयडीसी'नेच भूसंपादन करून रस्त्यांचे काम सुरू करावे, असे निर्देशही त्या वेळी देण्यात आले होते. त्यानंतर मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या बैठकीत या प्रकल्पांसाठीचे भूसंपादन 'पीएमआरडीए'कडे देण्यात आले. या गोंधळात गेल्या सहा महिन्यांत केवळ भूसंपादन कोण करणार याचा निर्णय झालेला नव्हता. आता पुन्हा 'पीएमआरडीए'कडून हे भूसंपादन 'एमआयडीसी'कडे आले आहे.

> हिंजवडी आयटी पार्कमधील उड्डाणपुलासह पर्यायी रस्त्यांच्या प्रकल्पांसंदर्भात शेतकऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांनी जमिनीच्या बदल्यात 'टीडीआर'ऐवजी रोख रक्कम द्यावी, अशी मागणी केली. यामुळे आता हे भूसंपादन करण्यासाठी 'एमआयडीसी'ने जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव द्यावा.
>
> **– डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.**

# आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळा, मनपाच्या आरोग्य विभागामार्फत आवाहन

## उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाचे वृक्ष लागवड मोहिम, १.५ लाख देशी झाडांची लागवड करण्याचे उद्दिष्ट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होताच डेंगू, मलेरिया, चिकनगुनिया यांसारख्या डास जन्य आजारांचा धोका लक्षणीय प्रमाणात वाढ होवू लागली आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य तसेच वैद्यकीय विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यास सुरुवात केली आहे. तसेच डेंग्यूबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यास देखील भर दिला जात आहे.

एडिस इजिप्ती हा डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो, व त्यातून डासांची उत्पत्ती होते. कुलर, फ्रिज, कुंड्या, फुलदाणी, प्लास्टिकच्या टाकाऊ वस्तू, नारळाच्या करवंट्या, काचेच्या फुटक्या बाटल्या आदी भंगार साहित्यात पाणी साचले तर त्यामध्ये या डासांची उत्पत्ती होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पावसाळ्यात डासजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या उपाययोजनांमध्ये नागरिकांनी देखील सक्रियपणे सहभागी व्हावे. तसेच आपला परिसर स्वच्छ ठेवा आणि आठवड्यातून एक दिवस हा 'कोरडा दिवस' पाळा, असे आवाहन देखील महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.




### येथे होते डासांची उत्पत्ती...

» एडिस इजिप्ती हा डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो, व त्यातून डासांची उत्पत्ती होते. कुलर, फ्रिज, कुंड्या, फुलदाणी, प्लास्टिकच्या टाकाऊ वस्तू, नारळाच्या करवंट्या, काचेच्या फुटक्या बाटल्या आदी भंगार साहित्यात पाणी साचले तर त्यामध्ये या डासांची उत्पत्ती होते. उघड्या पाण्याच्या टाक्या, जुने टायर, उघडे हौद, उघडे सेफ्टीक टँक, रस्त्यावर खड्डयात साचलेले पावसाचे पाणी, सांडपाणी येथेही या डासांची उत्पत्ती होते.

> "महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाय योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांनी घाबरून न जाता सहकार्य करावे. डेंग्यूवर वेळीच उपचार केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होतो त्यामुळे नागरिकांनी देखील डेंग्यू मलेरियाच्या नायनाटासाठी महापालिकेस सर्वतोपरी सहकार्य करावे."
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

> "महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून डेंग्यू मलेरिया बाबत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या असून, नागरिकांनी डेंग्यू मलेरिया बाबत काही प्राथमिक लक्षणे दिसल्यास त्वरित नजीकच्या महानगरपालिका रुग्णालयात उपचारासाठी संपर्क साधावा.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे , वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका**

> "डेंग्यू व मलेरियाची डासांची उत्पत्ती टाळण्यासाठी नागरिकांनी स्वतःच्या घराबरोबर आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा. घरगुती कुलर, टायर, कुंड्यांची दर आठवड्याला स्वच्छता करावी तसेच आठवड्यातील कोरडा दिवस न चुकता पाळावा. डेंग्यू मलेरियाचे निर्मूलन करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात असून, नागरिकांनी देखील महापालिकेस सहकार्य करावे."
>
> **- सचिन पवार, उपायुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महापालिका**

---

# 'आयुष्मान भारत' योजनेचा रुग्णाना लाभ न दिल्यास रुग्णालयांवर होणार कारवाई; केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची ग्वाही

## रुग्णालयांवर कारवाई करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्याकडे केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेअंतर्गत (पीएम-जेएवाय) पुणे जिल्ह्यातील अनेक खासगी रुग्णालये हे आयुष्मान योजनेचे कार्ड काढलेल्या रुग्णांना लाभ देत नाहीत. त्यामुळे अशा रुग्णालयांवर कारवाई करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्याकडे केली आहे. त्यावर या रुग्णालयांची तात्काळ माहिती घेण्याचे आदेश नड्डा यांनी सचिवाला दिले आहेत. त्यामुळे ज्येष्ठांना मदत न देणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई होईल, असे बारणे यांनी सांगितले.

याबाबत खासदार बारणे यांनी दिल्लीत मंत्री नड्डा यांची भेट घेतली. पुणे जिल्ह्यातील आयुष्मान भारत योजनेत असलेल्या १४८ रुग्णालयांची माहिती दिली. या योजनेत आणखी रुग्णालयांचा समावेश करण्याची मागणी केली. खासदार बारणे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने २३ सप्टेंबर २०१८ पासून देशभरात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (पीएम-जेएवाय) राबविण्यात आली आहे.

गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार आणि मोफत आरोग्य सेवा प्रदान करणे हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत, ज्येष्ठ नागरिकांना उपचारांसाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये म्हणून त्यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. आयुष्मान भारत पीएम जन आरोग्य योजनेत (AB PM-JAY) आता ७० वर्षे वयोगटातील वृद्धांचा समावेश करण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात १६८ खासगी रुग्णालयापैकी ठरावीक रुग्णालये या योजनेअंतर्गत सेवा देत आहेत. उर्वरित रुग्णालये आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपचार करणार नसल्याचे सांगत ज्येष्ठ नागरिकांवर उपचार करण्यास नकार देत आहेत. ही परिस्थिती केवळ केंद्र सरकारच्या आदेशांचे उल्लंघन नाही तर ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य हक्कांचे उल्लंघन आहे.

यामुळे पुणे जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ नागरिकांना वेळेवर योग्य वैद्यकीय सुविधा मिळू शकत नाहीत. ज्यामुळे त्यांचे जीवन धोक्यात येते. त्यांना वैयक्तिक खर्चाचा मोठा भार सहन करावा लागतो. ही योजना जाणूनबुजून राबवत नसलेल्या सर्व रुग्णालयांवर आवश्यक कायदेशीर कारवाई करावी.



पुणे जिल्ह्यातील सर्व सूचीबद्ध रुग्णालयांना ही योजना सक्तीने राबवण्यासाठी आवश्यक सूचना तात्काळ द्याव्यात. त्याचबरोबर या योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना सुलभ आणि त्रासमुक्त पद्धतीने उपचार उपलब्ध होतील याची खात्री करण्यासाठी एक देखरेख यंत्रणा स्थापन करावी, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

> महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत दीड लाख तर आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पाच लाख रुपयांपर्यंत मदत मिळते. त्यामुळे अनेक रुग्णालये मदत देण्याचे टाळतात. याबाबत केंद्रीय आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा यांची भेट घेतली. ही योजना अतिशय चांगली आहे. प्रत्यक्षात रुग्णालये ज्येष्ठांना योजनेचा लाभ देत नाहीत. याची चौकशी करुन अशा रुग्णालयांवर कारवाईची ग्वाही त्यांनी दिली आहे.
>
> **- श्रीरंग बारणे, खासदार, मावळ लोकसभा**

# जोरदार बरसणार 'आषाढ सरी' शहरासह जिल्ह्यात 110 टक्के पावसाचा अंदाज

## धोकादायक दरडी व घाटातील रस्त्याच्या बाजूला पाणी वाहून जाण्यासाठी चारीमध्ये कोसळलेले दगड यामुळे घाट रस्त्यातील प्रवास धोकादायक झाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढ मास सुरू आहे. या मराठी महिन्यात यंदा पाऊस मुबलक पडणार असल्याचे भाकीत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, यंदाचा पावसाळा गत 33 वर्षांतील दुर्मीळ असून, सर्वच नक्षत्रे भरपूर पाऊस देणारी आहेत. रोहिणी, मृग आणि आर्द्रा नक्षत्रातही धो-धो पाऊस सुरू असल्याने यंदाचा मान्सून विक्रमी पावसाचा ठरणार आहे. या महिन्यात सरासरी 110 टक्के पावसाचा अंदाज आहे.

गायकैवारी यांनी सांगितले की, आम्ही 'वराह मिहिर' यांच्या ग्रंथाच्या नोंदीनुसार एक मॉडेल तयार केले आहे. त्यानुसार यंदा आषाढात शहर परिसरासह संपूर्ण जिल्ह्यात भरघोस पाऊस पडेल. गत 33 वर्षांतील यंदाच्या नोंदी या विक्रमी पावसाच्या आहेत. कारण, घाटमाथ्यावर वैशाख, ज्येष्ठ महिन्यात भरपूर पाऊस झाला. तो आषाढातही बरसणार आहे.

आषाढ मासाचे सुंदर वर्णन महाकवि कालिदासांच्या 'मेघदूत' या महाकाव्यात केले आहे. आचार्य प्र. के. अत्रे यांनीही 'आषाढस्य प्रथम दिवसे' या लेखात आषाढ महिन्याचे मनोहारी वर्णन केले आहे. या महिन्यात सृष्टी हिरवागार शालू नसते, त्यामुळे आषाढ मास सर्वांना आवडतो. असा महाकवींना आवडणारा आषाढ मास गुरुवारपासून सुरू होत आहे. प्राचीन काळातील पर्जन्यमानाचे अभ्यासक वराह मिहिर यांनी त्यांच्या ग्रंथांतील नोंदीचा अभ्यास करणारे राघवेंद्र गायकैवारी यांच्या मते यंदा शहरात आषाढ सरी जोरदार बरसतील. आषाढ मास 26 जून ते 24 जुलै या कालावधीत आहे. या कालावधीत सुमारे 110 टक्के पाऊस बरसणार असल्याचा अंदाज दिला आहे.



### आषाढात 110 टक्के पावसाचा अंदाज...

» 30 जूनपर्यंत शहरात हलका पाऊस राहील. मात्र, हवेचा दाब 5 जुलैपासून अनुकूल होत आहे. त्यामुळे 5 ते 24 जुलै असा सुमारे वीस दिवस या मराठी मासात चांगला पाऊस राहील. जुलैचे शहराचे पर्जन्यमान हे 240 ते 260 मिलिमीटर इतके आहे. यंदा हा पाऊस 300 ते 350 मि.मी. पेक्षा जास्त होऊ शकतो, असाही अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

### घाट माथ्यावरचा पाऊस कमाल करणार...

» गायकैवारी यांनी सांगितले की, आम्ही 'वराह मिहिर' यांच्या ग्रंथाच्या नोंदीनुसार एक मॉडेल तयार केले आहे. त्यानुसार यंदा आषाढात शहर परिसरासह संपूर्ण जिल्ह्यात भरघोस पाऊस पडेल. गत 33 वर्षांतील यंदाच्या नोंदी या विक्रमी पावसाच्या आहेत. कारण, घाटमाथ्यावर वैशाख, ज्येष्ठ महिन्यात भरपूर पाऊस झाला. तो आषाढातही बरसणार आहे.

### मराठी महिन्यांत झालेला विक्रमी पाऊस.

» वैशाख कृ.5 (दि.17 मे) ते ज्येष्ठ शु. 1 (दि.27 मे): 270 मि.मी
ज्येष्ठ शु 2 (दि.28 मे) ते ज्येष्ठ कृष्ण 14 (24 जून): 260.7 मी.मी
(वैशाख आणि ज्येष्ठ मिळून एकूण पाऊस: 530 मि.मी)

> पुराण काळातील पर्जन्यमानाचे अभ्यासक 'वराह मिहिर' यांच्या ग्रंथातील नोंदीवर आधारित तयार केलेल्या मॉडेलनुसार जो अंदाज आम्ही दिला आहे, त्याप्रमाणे सर्वच मराठी मास आणि नक्षत्रांत शहर आणि जिल्ह्यात पाऊस चांगला आहे. प्रामुख्याने राज्यात पुणे जिल्हा आणि कोकण विभागात अतिवृष्टी होईल.
>
> - राघवेंद्र गायकैवारी, वराह मिहिर मॉडेलचे अभ्यासक, पुणे

# जंगलात सोडलेल्या जनावरांची अन्नपाण्याविना तडफड

## अनेक शेतकरी नवीन जन्माला आलेले गोऱ्हे आडमार्गी रस्त्याच्या कडेला,जंगलात सोडून देत आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

अनेक शेतकरी नवीन जन्माला आलेले गोऱ्हे आडमार्गी रस्त्याच्या कडेला,जंगलात सोडून देत आहेत. परंतु ही वासरे अन्न पाण्याशिवाय ओरडून ओरडून आपला जीव सोडत आहेत.त्यामुळे माणूस किती स्वार्थी झाला आहे. हे दिसून येते. शासनाने गोहत्या बंदी कायदा केला. परंतु यावर उपाययोजना कुठल्याही प्रकारची केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडे उत्पादन न देणारी ही जनावरे सांभाळण्यासाठी शासनाने पांजरपोळ गोशाळा सुरू करणे गरजेचे आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील पिंपळगाव, काठापूर बुद्रुक,लाखनगाव ,जारकरवाडी,देवगाव,पोंदेवाडी या परिसरात स्थानिक शेतकऱ्यांच्या पडीक क्षेत्रात लहान वासरे मोकाट स्वरूपात सोडली जात आहेत. खायला पुरेसे अन्न न मिळाल्याने या वासरांचा मृत्यू होत असून काही वासरे कुत्र्यांच्या भक्षस्थानी पडत आहेत. वासरे मृत्यू पावल्यानंतर त्यांची दुर्गंधी येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना व स्थानिकांना सहन करावी लागत आहे.

या प्रकाराला नक्की जबाबदार कोण हा प्रश्न उभा राहिला आहे. मोकाट सोडलेली वासरे मोकाट कुत्र्यांच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत.मात्र शिल्लक राहिलेले वासरू कुत्र्यांनी न खाल्ल्याने त्याची मोठ्या प्रमाणात दुर्गंधी सुटत आहे.त्याचा थेट परिणाम स्थानिकांच्या आरोग्यावरती होत आहे.तसेच मोकाट कुत्र्यांना खायला काहीही न मिळाल्यानंतर ते स्थानिक शेतकऱ्यांच्या



वासरांवरती, शेळ्यांवरती हल्ला करत आहेत. आधीच या परिसरात बिबट्याचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य व वावर आहे. त्यात आलेले हे नवीन संकट या परिसरातील शेतकरी व स्थानिक रहिवासी यांच्या पुढे उभे आहे.याबाबत प्रशासनाने लवकरात लवकर तोडगा काढावा. अशी मागणी सामाजिक शेतकरी व रहिवासी पुढे आली आहे

### जनावरानाच मागणीच नाही

» महाराष्ट्र शासनाने गोहत्या बंदी कायदा लागू केल्यापासून मोठ्या प्रमाणावर लहान वासरे, भाकड, गाई यांचा प्रश्न ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपुढे उभा राहिला आहे.कायदा लागू झाल्यापासून भाकड जनावरांची मागणी पूर्णपणे थांबली आहे चांगली गायी सुद्धा अल्प किमतीला विकली जात आहे.यामुळे दुध न देणाऱ्या गाई त्याचप्रमाणे नवीन जन्माला आलेली वासरे,गोऱ्हे यांचं करायचं काय हा प्रश्न उभा राहिला आहे.

### वासरांचा प्रश्न अनुत्तरीतच

» गाई,गोऱ्हे, वासरे गाभण, न राहणाऱ्या गाई, लहान जन्माला आलेले गोऱ्हे सांभाळण्यासाठी व्यवस्था उभी केली पाहिजे. गावांमध्ये सध्या जर्शी गायींचे वासरे,गोऱ्हे अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला,ओढ्याच्या कडेला, वनविभागाच्या जागेत,सार्वजनिक गायरान जागेत अशा अनेक ठिकाणी सोडलेले पहावयास मिळत आहेत. या वासरांचा प्रश्न उभा राहिला असून अन्नपाण्याशिवाय ओरडणारी वासरे मन सुन्न करत असून याकडे दुर्लक्ष होत आहे.